# दैनिक अक्षराज

अचूक वेध, अचूक बातमी


संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

**वर्ष : ०४**, अंक : १४७
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.com
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, बुधवार, दि.०८ जानेवारी २०२५


कोणतेही कार्य अडथळ्याशिवाय पार पडत नाही. शेवटपर्यंत जे प्रयत्न करतात त्यांनाच यश प्राप्त होते.

## गरीब विक्रेत्यांना लक्ष्य करू नका; खा. नीलेश लंके यांचा इशारा



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.७, अहिल्यानगर :** शहरात महानगरपालिका अतिक्रमण मोहीम राबवत असून, रस्त्याच्या कडेला फळविक्री करणारे, हातगाडीवाले, चहावाले यांसारख्या गरीब लोकांना लक्ष्य केले जात आहे. या मोहिमेमुळे त्यांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न गंभीर झाला आहे. हे विक्रेते कोणतेही कायमस्वरूपी बांधकाम न करता फक्त रस्त्याच्या कडेला बसून आपल्या कुटुंबासाठी रोजीरोटी मिळवत आहेत. वाढत्या लोकसंख्येमुळे प्रत्येकाला व्यवसायासाठी स्वतंत्र जागा मिळणे शक्य नाही, हे लक्षात घेतले पाहिजे. खासदार निलेश लंके यांनी या रस्त्यावरील फळविक्रेत्यांची भेट घेतली आणि त्यांच्या परिस्थितीबद्दल संवेदनशीलता व्यक्त केली. त्यांनी महानगरपालिका अधिकाऱ्यांशी संवाद साधत गरीब लोकांना त्रास देणे तात्काळ थांबवावे, असा आदेश दिला. हे मेहनती गरीब लोक दिवसरात्र कष्ट करून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह चालवत आहेत. त्यांना हटवून त्यांच्या पोटावर पाय देणे अमानवी आहे. नो-हॉकर्स झोनमध्ये नियम लागू करा, पण ज्यांच्याकडे कोणतेही कायमस्वरूपी बांधकाम नाही त्यांना लक्ष्य करू नका, असे त्यांनी सांगितले. खासदार लंके यांनी स्पष्ट शब्दांत महानगरपालिका अधिकाऱ्यांना सांगितले की, गरीबांना हटवून त्यांची उपजीविका काढून घेणे हा भेदभाव आहे. जर गरीबांवरच कारवाई केली जाणार असेल, तर त्यांच्या कुटुंबांचे पालनपोषण कसे होणार? महानगरपालिका आयुक्त त्यांना अन्न पुरवणार नाहीत. त्यामुळे या गरीब विक्रेत्यांना त्यांच्या हक्काचे काम करण्याची परवानगी द्या. खासदार निलेश लंके यांच्या या हस्तक्षेपामुळे गरीब विक्रेत्यांना आधार मिळाला आहे. त्यांच्या संघर्षाला एक दिशा मिळाली असून प्रशासनाने आता संवेदनशील होऊन योग्य ती भूमिका घ्यावी, अशी मागणी होत आहे.

## निकृष्ट काम खपवून घेतले जाणार नाही : आ.दाते



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.७, पारनेर (अहिल्यानगर) :** पारनेर जामगांव रस्त्याचे चालू असलेले काम अत्यंत संथ गतीने व निकृष्ट दर्जाचे आहे. जामगांव येथे पानमळा परिसरात धुळीचे साम्राज्य पसरल्याने ये जा करणाऱ्या नागरिकांना मनस्ताप सहन करावा लागत आहे. रस्त्याच्या आजूबाजूला असणाऱ्या पिकांवर धुळीचा थर साचून पिकांचे नुकसान झाल्याची तक्रार शेतकऱ्यांनी केली. याबाबत शेतकऱ्यांनी रास्ता रोको आंदोलन करण्याचा इशारा दिला. तालुक्याचे आमदार काशिनाथ दाते यांनी सदर ठिकाणी भेट देऊन नागरिकांचे म्हणणे ऐकून घेऊन सदर रस्त्याच्या ठेकेदारास संपर्क करून निकृष्ट दर्जाचे काम खपवून घेतले जाणार नाही. त्यामुळे चांगल्या दर्जाचे काम करण्यात यावे व सदर रस्त्याचे काम लवकरात लवकर काम पूर्ण करण्याच्या सुचना दिल्या. यावेळी मा. सरपंच दिनकर सोबले, मनोज शिंदे, संतोष चौधरी, उत्तम चौधरी, बबन चौधरी, सागर चौधरी यांच्यासह मोठ्या प्रमाणावर शेतकरी वर्ग उपस्थित होता. लवकर तोडगा निघाल्याने उपस्थित नागरिक व शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त केले. जामगांव ते पारनेर या चालू असलेल्या रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे आहे. याबाबत सदर ठेकेदारस जाब विचारला असता ठेकेदार उडवा उडवीची उत्तरे देत होता. यापुढे जर सदर रस्त्याच्या कामात सुधारणा न दिसल्यास काम बंद पाडण्यात येईल असा इशारा सरपंच दिनकर सोबले यांनी दिला.

## शासकीय वसतिगृहेदेखील असुरक्षित!

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०७, बुलडाणा :** शासकीय वसतिगृहेदेखील विद्यार्थ्यांसाठी सुरक्षित नसल्याचे धक्कादायक चित्र आहे. चिखली तालुक्यातील एका शासकीय वसतिगृहात एका १३ वर्षीय विद्यार्थ्यावर शारीरिक अत्याचार करण्यात आला असून अधीक्षकानेच हे घृणास्पद कृत्य केल्याचे उघड झाल्याने खळबळ उडाली आहे.

१३ वर्षीय मुलाचा अधीक्षकाने लैंगिक छळ केल्याची संतापजनक घटना चिखली तालुक्यातील पेठ येथील वसतिगृहात घडली. अमडापूर पोलिसांनी आरोपीला गजाआड केले. ठाणेदार निखिल निर्मळ यांनी भारतीय न्यायसंहिता कलम ६८, ११८ (१) व पोक्सो कायद्यांतर्गत गुन्हे दाखल करून आरोपीला अटक केली. विनायक (विनोद) देशमुख (५२) असे आरोपी अधीक्षकाचे नाव असून, तो पेठ येथील रहिवासी आहे. तालुक्यातील पेठ येथे मागासवर्गीय मुलांसाठी शासकीय अनुदान तत्त्वावर वसतिगृह कार्यान्वित आहे. या ठिकाणी जालना जिल्ह्यातील मजूर कुटुंबातील पीडित मुलगा शिक्षण घेण्यासाठी प्रवेशित झाला होता. या मुलासोबत अधीक्षकच अनैसर्गिक कृत्य करत असल्याची बाब उघडकीस आली. पीडित मुलाचा १ नोव्हेंबर २०२४ ते ५ जानेवारी २०२५ या कालावधीत अधीक्षकाने लैंगिक छळ केला. ही बाब मुलाने आईला सांगितली. कुटुंबीयांनी अमडापूर पोलीस ठाणे गाठून तक्रार नोंदविली. ठाणेदार निखिल निर्मळ यांनी ही घटना गांभीर्याने घेत अधीक्षक देशमुखविरुद्ध विविध कलमान्वये गुन्ह्य दाखल केला. आरोपीने अशा पद्धतीचे आणखी काही विकृत गुन्हे केले काय? या दृष्टीने तपास सुरू आहे.

### आरोपी रुग्णालयात दाखल

आरोपीला तातडीने ताब्यात घेण्यात आले. मात्र, तो बीपी, शुगरचा रुग्ण होता. बीपीचा त्रास होऊ लागल्याने त्याला अमडापूरच्या रुग्णालयात नेण्यात आले. तेथून चिखली येथे भरती करण्यात आले. नंतर बुलढाणा जिल्हा रुग्णालयात पाठविण्यात आले. आज सुट्टी झाल्यानंतर पोलिसांनी त्याला अटक केली.

# एचएमव्हीपी व्हायरसला रोखण्यासाठी पुणे महापालिका सज्ज




**अक्षराज : स्वामी दळवी**

**दि.०७, पुणे :** जगात थैमान घातलेल्या कोरोना महामारीनंतर आता पुन्हा एकदा अनेक देश धोकादायक व्हायरसच्या विळख्यात सापडले आहे. ह्युमन मेटाप्युमोव्हायरस (HMPV) या चीनमधील नव्या व्हायरसमुळे पुन्हा देशांची डोकेदुखी वाढली आहे.

भारतात ह्युमन मेटाप्युमोव्हायरस (HMPV) प्रकरणे आढळल्यानंतर आता, पुणे महानगरपालिकेने आपली तयारी वाढवली आहे. या विषाणूसंबंधी मार्गदर्शक तत्त्वे जारी केली आहेत.चीनमध्ये फैलावलेल्या 'एचएमव्हीपी' या विषाणूमुळे होणाऱ्या संसर्गज्य आजाराच्या पार्श्वभुमीवर पुणे महापालिकेचा आरोग्य विभाग अलर्ट मोडवर आला आहे. राज्य सरकारकडून मिळालेल्या सुचनेनुसार कार्यवाही सुरु केली असुन, नायडू रुग्णालयात साडे तीनशे बेड राखीव ठेवण्यात आले आहेत.

एचएमव्हीपी या विषाणूचा चीन मध्ये फैलाव झाला आहे. तसेच मलेशिया मध्ये या विषाणूची बाधा झालेले रुग्ण आढळून आले आहेत. या पार्श्वभुमीवर केंद्र सरकार आणि राज्य सरकारने स्थानिक स्वराज्य संस्थांना निर्देश दिले आहे. त्यानुसार पुणे महापालिकेने कार्यवाही करण्यास सुरुवात केली आहे. राज्य शासनाच्या आरोग्य विभागाने स्थानिक स्वाराज्य संस्थांच्या आरोग्य विभागांसाठी नियमावली तयार केली आहे.

याबाबत ३ आणि ६ जानेवारीला राज्य शासनाची बैठक पार पडली. त्यावेळी ही नियमावली जाहीर केली असून महापालिकेच्या प्रत्येक रुग्णालयांना पाळण्याचे आदेश दिले आहेत. पुण्यात या व्हायरस संदर्भात खबरदारीसाठी उपाययोजना करण्यात येत आहे. त्यात नागरिकांनी कशी काळजी घ्यावी या संदर्भात माहिती देण्यात आली आहे. राज्यात अजून एकाही रुग्ण नाही पण महापालिका खबरदारीचा उपाय म्हणून बेड राखीव ठेवण्यासाठी पत्र देण्यात आले आहेत.

### व्हायरस नेमका काय आहे?

## नायडू रुग्णालयात ३५० बेड राखीव!

ह्युमन मेटान्यूमो व्हायरस (क्वझत) हा थंडीच्या दिवसांमध्ये जास्त वेगानं पसरतो. तो फुफुस्सांमध्ये वेगानं पसरतो आणि त्यामुळे न्युमोनिया होण्याचा धोका असतो. परिणामी श्वास घ्यायलाही त्रास होते. छाती भरुन येते, लहान मुलं आणि वृद्धांना हा व्हायरस जास्त प्रभावित करतो. सगळ्यात आधी २००१ साली या व्हायरसची ओळख पटली होती. हा व्हायरस संक्रमित व्यक्तीच्या खोकल्याने, शिंक दिल्याने तसंच त्याच्याशी हात मिळवल्याने किंवा त्याला स्पर्श केल्यानेही पसरू शकतो. एचएमपीव्ही व्हायरसने संक्रमित झाल्याच्या पाच दिवसांनंतर या व्हायरसची लक्षणं दिसायला लागतात.

### काय आहेत व्हायरसची लक्षणं?

सर्दी, घशात खवखव, डोकेदुखी, ताप येणं, थंडी वाजणं, नाक गळणं, खोकला होणं, श्वास घ्यायला त्रास होणं, गंभीर लक्षणांमध्ये फुफुस्सांमध्ये संक्रमण होऊ शकतं, श्वसना संदर्भातले आजार असणाऱ्यांनी खासकरून अस्थमा आणि फुफुस्सांचे आजार असणाऱ्यांनी सर्तक राहण्याची गरज आहे.

### अशी घ्या काळजी...

**खोकताना, शिंकताना तोंड आणि नाक रुमाल किंवा टिश्यू पेपरने झाका.**
**साबण, पाणी किंवा अल्कोहोल आधारित सॅनिटायझरने हात वारंवार धुवा.**
**ताप, खोकला आणि शिंका येत असल्यास सार्वजनिक ठिकाणांपासून दूर राहा.**
**भरपूर पाणी प्या आणि पौष्टिक आहार घ्या.**
**संक्रमण कमी करण्यासाठी सर्व ठिकाणी पुरेसे वायुविजन ठेवा.**

### लहान मुलांना किती धोका?

डॉ. खिलनानी म्हणाले की, हा व्हायरस दोन वर्षांपेक्षा कमी वयाच्या मुलांना आणि वृद्धांना त्वरीत प्रभावित करतो. या व्हायरसचा कालावधी तीन ते सहा दिवसांचा असतो. ताप, सर्दी आणि खोकला हीच त्याची लक्षणं आहेत. ज्यांची प्रतिकारशक्ती कमकुवत आहे अशा लोकांवर याचा त्वरीत परिणाम होतो. अशा लोकांना आयसीयूमध्येही दाखल करावे लागू शकते.

### कोणतीही लस किंवा औषध नाही

डॉ. खिलनानी यांच्या मते, ह्यूमन मेटान्यूमोव्हायरससाठी कोणतीही लस नाही. त्याच वेळी, आमच्याकडे त्याचे अँटी-व्हायरल औषध देखील नाही. त्याच्यावर उपचार लक्षणांनुसार केले जातात. त्यामुळेच आतापर्यंत उघडकीस आलेल्या सर्व प्रकरणांमध्ये लक्षणांच्या आधारे रुग्णावर उपचार केले जात आहेत.

# वाहनांसाठी (एचएसआरपी) नंबर प्लेट अनिवार्य! दंड टाळण्यासाठी ३१ मार्चपूर्वी बसवा..

**अक्षराज : भानुदास गायकवाड**

**दि.७, कल्याण (ठाणे) :** वाहनांच्या सुरक्षिततेसाठी आणि बनावट नंबरप्लेटसारख्या समस्यांना रोखण्यासाठी महाराष्ट्र शासनाने हाय सिक्युरिटी रजिस्ट्रेशन प्लेट (एचएसआरपी) सर्व वाहनांसाठी अनिवार्य केली आहे. ज्यांच्या गाडीला (एचएसआरपी) नंबरप्लेट नसेल, त्यांना ३१ मार्च २०२५ नंतर दंडात्मक कारवाईचा सामना करावा लागणार आहे. परिवहन विभागाच्या निवेदनानुसार, ही कारवाई अधिक प्रभावीपणे अंमलात आणली जाणार आहे.

### एचएसआरपी नंबर प्लेट कशासाठी?

एचएसआरपी नंबरप्लेटसाठी केंद्रीय मोटार वाहन नियम १९८९च्या नियम ५० नुसार तरतूद करण्यात आली आहे. या नंबरप्लेटमध्ये छेडछाड करणे कठीण असल्याने वाहन चोरी, बनावट नंबरप्लेटच्या घटना, आणि गुन्हेगारी रोखण्यासाठी याचा उपयोग होईल.




या नंबरप्लेटच्या मदतीने रस्त्यावर असलेल्या वाहनांची ओळख अधिक सहजपणे पटवता येईल. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांनुसार, ही योजना लागू करण्यात आली आहे.

### एचएसआरपी नंबर प्लेट कशी बुक कराल?

वाहनधारकांना https://mhhsrp.com या अधिकृत पोर्टलवर जाऊन त्यांच्या वाहनासाठी एचएसआरपी नंबर प्लेट बुक करता येईल. एकदा बुकिंग पूर्ण झाल्यानंतर, वाहनधारक त्यांच्या सोयीने अपॉइंटमेंट घेऊन अधिकृत केंद्रातून नंबर प्लेट बसवू शकतात.

### दंड आणि अडचणींवर सावधान!

परिवहन विभागाने स्पष्ट केले आहे की, ३१ मार्चनंतर एचएसआरपी नंबरप्लेट नसलेल्या वाहनांवर दंडात्मक कार्यवाही केली जाईल. तसेच, नंबरप्लेट नसलेल्या वाहनांसाठी काही मूलभूत कामे जसे की मालकी हक्क बदल, पत्ता बदल, विमा नोंदणी इत्यादी रद्द करण्यात येऊ शकतात.

### एचएसआरपी नंबरप्लेटचा खर्च किती?

१. दुचाकी आणि ट्रॅक्टर: ४५० + जीएसटी
२. तीनचाकी वाहन: ५०० + जीएसटी
३. हलकी/जड व्यावसायिक वाहने व प्रवासी कार: ७४५ + जीएसटी

वाहनधारकांनी वेळेपूर्वी ही नंबरप्लेट बसवून भविष्यातील अडचणींना टाळावे, असे आवाहन वाहतूक पोलिसांनी केले आहे.

## गतीमान आणि पारदर्शी कारभारासाठी महाराष्ट्रात राबविले जाणार 'ई कॅबीनेट' - मुख्यमंत्री

**दि.७, मुंबई :** राज्यात 'ई कॅबीनेट' मध्ये होणारे निर्णय पोर्टलच्या माध्यमातून जनतेला उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या निर्णयाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील कारभार गतीमान आणि पारदर्शी करण्यावर भर दिला असून मंत्रिमंडळातील निर्णय लोकांपर्यंत तातडीने पोहचणे, सर्वसामान्यांचे प्रश्न सोडविण्यावर भर दिला आहे. याबाबतचे सादरीकरण आज मुख्य सचिव सुजाता सौनिक यांनी मंत्रिमंडळ बैठकीनंतर केले.

'ई-कॅबिनेट' हा राज्य शासनाचा पर्यावरणपूरक उपक्रम आहे. मंत्रिमंडळ बैठकीसाठी कागदांचा मोठ्या प्रमाणावर होणारा वापर कमी करण्यासाठी हे संपूर्ण आयसीटी सोल्यूशन महत्त्वपूर्ण ठरणार आहे. या हरित उपक्रमांतर्गत स्मार्ट टॅब्लेट्सद्वारे कागदविरहीत मंत्रिमंडळ बैठक सहज पार पडू शकेल. या प्रणालीमुळे मा. मंत्र्यांसाठी अत्यंत सुलभ डॅशबोर्ड उपलब्ध होतील.

त्याचबरोबर आवश्यक संदर्भ शोधणे, कृती बिंदू (ॲक्शन पॉइंट) पाहणे आणि घेतलेल्या निर्णयांच्या अंमलबजावणीबाबत पुनरावलोकन करणे सोपे होईल. ई-कॅबिनेटमुळे मंत्रिमंडळ बैठकांचे, निर्णयांचे व त्यासंबंधीच्या दस्तऐवजांचे जतन होईल.



मंत्रिमंडळ निर्णय आणि त्यासंबंधीचे संदर्भ शोधणे सहज शक्य होईल. ही प्रणाली पूर्णपणे डीजिटल स्वरूपात असून याद्वारे प्रत्येक टप्पा सहज पार पाडला जाईल. आतापर्यंत होत आलेल्या पारंपरिक मंत्रिमंडळ बैठकांमध्ये येणाऱ्या विविध अडचणींवर या प्रणालीमुळे मात करता येईल.

मंत्रिमंडळासमोर सादर करण्यात येणारा प्रस्ताव ऑनलाईन अपलोड करणे, तो मंत्रिमंडळासमोर चर्चेसाठी आणि निर्णयासाठी सादर करणे, त्यावर अंतिम निर्णय व त्याबाबतच्या सर्व नोंदी ठेवणे, ही सर्व प्रक्रिया सहजरित्या पार पडणार आहेत. हा सुशासनाच्या पूर्ततेतील एक महत्त्वाचा टप्पा आहे.

## मुंबईच्या किमान तापमानात घट

**दि.७, मुंबई :** मागील काही दिवस मुंबईत असह्य उकाडा सहन करावा लागत होता. मात्र मंगळवारी पहाटे गारव्यामुळे मुंबईकरांना काहीसा दिलासा मिळाला. दरम्यान, पुढील दोन – तीन दिवस तापमानातील घट कायम राहणार असल्याचा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे. हवामान विभागाच्या सांताक्रूझ केंद्रात मंगळवारी १५.२ अंश सेल्सिअस किमान तापमानाची नोंद झाली. सोमवारच्या तुलनेत तापमानात १.६ अंशानी कमी नोंदले गेले. तर कुलाबा केंद्रात १८.६ अंश सेल्सिअस किमान तापमानाची नोंद झाली. सोमवारच्या तुलनेत तापमान एक अंशाने कमी नोंदले गेले. पुढील दोन – तीन दिवस मुंबईतील किमान तापमानातील ही घट कायम राहणार असल्याचा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे.

## संपादकीय



### पतंगराव

महाराष्ट्रातील राजकारणात जवळपास तीस वर्ष आपल्या कर्तुत्वाचा ठसा उमविणारे अजातशत्रू व्यक्तिमत्व असलेले काँग्रेसचे जेष्ठ नेते, महाराष्ट्राचे माजी मंत्री पतंगराव कदम यांची आज ८१ वी जयंती. ८१ वर्षापूर्वी आजच्याच दिवशी म्हणजे ८ जानेवारी १९४४ रोजी पतंगराव कदम यांचा जन्म सांगली जिल्ह्यातील सोनसळ या गावात एका गरीब कुटुंबात झाला.

त्यांचे चौथी पर्यंतचे शिक्षण गावातल्या शाळेत झाले तर सातवी पर्यंतचे शिक्षण शिरसगाव या गावात झाले. ११ वी पर्यंतचे शिक्षण म्हणजे त्या काळातील मॅट्रिक पर्यंतचे शिक्षण त्यांनी कमवा व शिका योजनेअंतर्गत पूर्ण केले. एफ. वाय बी. ए नंतर त्यांनी टीचर्स डिप्लोमा पूर्ण केला व शिक्षक होण्याचे स्वप्न उराशी बांधून पुणे गाठले. पुण्यातील हडपसर येथे दहा बाय दहाच्या पत्र्याच्या खोलीत राहून त्यांनी गोरगरिबांच्या मुलांना शिकवण्याचे काम सुरू केले. शिक्षक असतानाच गोरगरिबांच्या मुलांना उच्च शिक्षण मिळावे यासाठी काही तरी करावे असा विचार त्यांच्या मनात येऊ लागला त्यातूनच , भारती विद्यापीठाची मुहूर्तमेढ रोवली गेली. बा. ग पवार, वसंतराव म्हेत्रे, महादर सर, नीलाखे सर अशा पाच लोकांना घेऊन त्यांनी १० मे १९६४ रोजी भारती विद्यापीठाची स्थापना केली. त्यावेळी त्यांच्या खिशात अवघे ३८ रुपये होते.

हळूहळू भारती विदयापीठाचा विस्तार वाढू लागला. शहराप्रमाणे ग्रामीण भागातही भारती विद्यापीठाच्या पाट्या झळकू लागल्या. भारती विद्यापीठामुळे गोरगरिबांच्या मुलांना इंग्रजीतून शिक्षण मिळू लागले. सर्वसामान्य कुटुंबातील मुले उच्च शिक्षण घेऊ लागली. त्यांनी लावलेल्या भारती विद्यापीठाच्या रोपट्याचे आज वटवृक्ष बनले आहे. के.जी ते पी.जे असे सर्वप्रकारचे शिक्षण आज भारती विद्यापीठातून मिळत आहे. शैक्षणिक क्षेत्रात त्यांनी केलेले कार्य महान असेच आहे. भारती विद्यापीठाचा पसारा सांभाळीत त्यांनी राजकारणातही ठसा उमटविला. १९६८ साली एस टी महामंडळाच्या सदस्यपदी त्यांची निवड झाली. गाव तिथे एस टी ही योजना राबवून त्यांनी गावागावात एस टी पोहचवली. १९८५ साली त्यांनी अपक्ष म्हणून विधानसभेची निवडणूक लढवली. त्यात ते विजयी झाले. १९९० सालच्या विधानसभा निवडणुकीत त्यांना काँग्रेसने त्यांना तिकीट दिले तेंव्हापासून १९९५ सालचा अपवाद वगळता ते सतत निवडून आले. २०१४ साली मोदी लाटेत अनेक दिग्गज नेत्यांचा पराभव झाला पण त्यांनी आपला गड राखला. या दरम्यान त्यांनी शिक्षण, सहकार, उद्योग, महसूल, वन या महत्वाच्या खात्याची मंत्रीपदे सांभाळली. इतकी वर्ष मंत्रीपदावर राहूनही त्यांच्यावर एकही आरोप झाला नाही यातच त्यांचा कारभार किती पारदर्शक होता, हे दिसून येते.

काँग्रेस पक्षावर त्यांची नितांत श्रद्धा होती. सत्ता असो वा नसो काँग्रेस पक्षाशी ते कायम एकनिष्ठ राहिले. प्रत्येकवेळी मुख्यमंत्र्यांच्या स्पर्धेत त्यांचे नाव कायम चर्चेत असायचे, पण दुर्दैवाने ते मुख्यमंत्री बनू शकले नाही. तरीही त्यांनी याबाबत कधीही जाहीर नाराजी व्यक्त केली नाही. पक्ष सोडण्याचा विचारही त्यांच्या मनात कधी आला नाही. आजच्या आयाराम गयाराम संस्कृतीत पतंगरावांची निष्ठा उठून दिसते. पतंगराव तरुण पिढीसाठी मार्गदर्शक आहेत.


बेधडक आणि मनमोकळा स्वभाव हे त्यांचे वैशिष्ट्य होते. ओठात एक आणि पोटात एक असे पतंगरावांच्या बाबतीत कधीच झाले नाही. खऱ्याला खरे आणि खोट्याला खोटे म्हणण्याची त्यांची वृत्ती राजकारणात अभावानेच पाहायला मिळते. त्यांचे भाषण म्हणजे पर्वणीच. त्यांच्या भाषणात गावाकडचा रांगडेपणा असायचा. कार्यकर्त्यांचा गराडा कायम त्यांच्यासोबत असायचा. उद्घाटनाच्या कार्यक्रमाला पतंगरावांनाच बोलवायचे असा कार्यकर्त्यांचा आग्रह असायचा.

त्यांच्या कामाचा धडाका देखील जबरदस्त असायचा. आपल्या मतदारसंघात त्यांनी कामाचा डोंगर उभा केला होता. आपल्या मतदारसंघात एमआयडीसी उभारून त्यांनी अनेक उद्योगधंदे आणले. सूत गिरण्या, साखर कारखाने, वाईन पार्क, भारती विद्यापीठ, भारती हॉस्पिटल उभारून मोठ्या प्रमाणात उद्योग निर्मिती केली. त्यांच्या कामाचा झपाटा इतका असायचा की, एकदा पु. ल. देशपांडे म्हणाले की, हे पतंगराव नव्हेत तर रॉकेटराव आहेत. पतंगराव कदम यांनी सहकार क्षेत्रातही आपला ठसा उमटविला. ९ मार्च २०१८ रोजी पतंगराव कदम यांचे निधन झाले. त्यांच्या निधनाने महाराष्ट्रातील एक असामान्य व्यक्तिमत्व काळाच्या पडदयाआड गेले. त्यांच्या निधनाने महाराष्ट्राची मोठी हानी झाली. पतंगराव कदम यांना ८० व्या जयंतीदिनी विनम्र अभिवादन!

# समाज, अर्थ आणि राजकारणाचे महासागर

मधुजी लिमये यांचा जन्म पुणे येथे दि.०१ मे १९२२ रोजी झाला. त्यांचे वडिल शिक्षक होते. नोकरी निमित्त अनेक गावी जावे लागत असल्याने मधुजी लिमये यांचे शिक्षण त्यांच्या आजोळी पुण्यातच झाले. सन १९३७ साली मॅट्रिक झाल्यानंतर त्यांनी फर्ग्युसन महाविद्यालयात प्रवेश घेतला. तरूण वयातच त्यांचा परिचय एस.एम.जोशी, शिरूभाऊ लिमये, नानासाहेब गोरे व पां.वा.गाडगीळ यांच्याशी झाला. त्यांच्या प्रभावाने त्यांना राजकारण, समाजकारण यात रस वाटू लागला. एस.एम.जोशी यांच्या प्रोत्साहनाने वयाच्या १८व्या वर्षीच ते स्वातंत्र्य चळवळीत शिक्षण सोडून सामील झाले. सन १९४२च्या भारत छोडो आंदोलनात त्यांचा सहभाग असल्यामुळे त्यांना चार वर्षांचा तुरूंगवास भोगावा लागला होता. सन १९४८ साली त्यांची काँग्रेस सोशालिस्ट पक्षाच्या कार्यकारिणीवर निवड झाली. सन १९४९ साली समाजवादी पक्षाचे संयुक्त चिटणीस म्हणून त्यांची नेमणूक झाली.

मधुजींच्या जीवनात एक अशी घटना घडली होती. जी इतर कोणाच्या आयुष्यात क्वचितच घडली असेल किंवा येथून पुढे घडेल. मधू लिमये हे अस्सल मराठी माणूस होते. त्यामूळे ते निवडणूकीच्या रिंगणात उतरल्यावर साहजिकच निवडूण येणार हे ठरलेले असे. ते एकदा नव्हे तर चारवेळा निवडून आले आणि एकदाच त्यांना पराभवाचा सामना करावा लागला. मधू लिमये हे मूळचे पुण्याचे, मात्र चारवेळा खासदार झाले तेही बिहारमधून. राज्यसभेवर इतर राज्यातून गेलेले बरेच नेते सापडतील. मात्र इतर राज्यातून लोकांमधून निवडून लोकसभेत गेलेल्या नेत्यांची नावे फार नाहीत. मधू लिमये अशा मोजक्या नेत्यांपैकी एक आहेत. सन १९६४मध्ये सोशालिस्ट पार्टी आणि प्रजा सोशालिस्ट पार्टी हे दोन्ही पक्ष एकमेकांत विलीन झाले होते. त्यांनी एकत्र संयुक्त सोशालिस्ट पार्टी निर्माण केली. याच संयुक्त सोशालिस्ट पार्टीचे तिकिटावर मधू लिमये यांना मिळाले. बिहारमधील मुंगेर लोकसभा हा लिमयेंचा मतदारसंघ. येथे १९६४– ६७मध्ये पोटनिवडणूक झाली होती. त्या पोटनिवडणूकीत ते पहिल्यांदा लोकसभेवर गेले. या विजयानंतर ते संयुक्त सोशालिस्ट पार्टीच्या संसदीय बोर्डाचे अध्यक्षही झाले. बिहारमधीलच बांका मतदारसंघातून सन १९७३मध्ये ते निवडणुकीच्या रिंगणात उतरले आणि विजयीही झाले. मात्र, ही सुद्धा पोटनिवडणूक होती. दरम्यानच्या काळात आणीबाणी जाहीर झाली. त्यावेळी जयप्रकाश नारायण यांच्या नेतृत्त्वात इंदिरा गांधींविरोधातील बहुतांश पक्ष एकत्र आले आणि त्यांनी जनता दल स्थापन केला. जयप्रकाश नारायण हे त्याचे प्रमुख होते. सन १९७७मध्ये ते जनता पार्टीकडून बांका लोकसभा मतदारसंघातून विजयी झाले. मधुजी लिमये महाराष्ट्रातूनही निवडणूक लढले होते. संयुक्त महाराष्ट्र होण्यापूर्वी म्हणजे सन १९५७मध्ये मुंबईतील वांद्रे मतदारसंघातून ते निवडणुकीला उभे राहिले होते. मात्र, तिथे ते पराभूत झाले होते. मुंबईत पराभवाला सामोरे जावे लागलेल्या लिमयेंना बिहारमध्ये मात्र यश मिळाले.



गोवामुक्ती संग्रामासाठी त्यांनी आंदोलने केल्याने आणि लोकांना एकत्र केल्याने त्यांच्याबद्दल लोकांमध्ये आकर्षण होते. मात्र, निवडणुकीत त्याचा काही फायदा झाला नाही. सन १९७१च्या निवडणुकीत मुंगेर तर सन १९८०च्या निवडणुकीत बांकामधून पराभूत झाले. सलग दोनवेळा पराभव पदरी पडल्याने त्यानंतर त्यांचा राजकीय वावरही कमी होत गेला. पुढे सन १९८२ साली तर ते राजकारणातून बाहेरच पडले. ब्रिटीश आणि पोर्तुगीजांशी लढून तुरुंगात गेलेले स्वातंत्र्यसैनिक, राष्ट्रीय सवयंसेवक संघाच्या नेत्यांच्या दुहेरी सदस्यत्वाला आक्षेप घेऊन मोरारजी देसाई यांचे सरकार एकहाती पाडणारे नेते अशी मधू लिमये यांची ओळख आपल्याला माहीत आहेच. मात्र या सर्वात त्यांची एक उत्कृष्ट संसदपटू म्हणून देखील एक वेगळी ओळख होती. पक्षांतरबंदीच्या कायद्याला विरोध करताना त्यांनी जे मुद्दे मांडले होते त्यावरून आपल्याला त्यांच्या संसदीय राजकारणातील अनुभवाची एक झलक येते. जनमत आणि इतर राजकारणी पक्षांतरबंदीच्या बाजूने असताना मधू लिमये मात्र या विरोधात बोलत होते. त्यावेळी मधू लिमये संसदेचे सदस्य नव्हते, मात्र त्यांनी त्याविरोधात आपल्या लेखांमधून आवाज उठवला होता.

मधुजी लिमये यांनी विपुल लेखन केलेले आहे. त्रिमंत्री योजना, कम्युनिस्ट जाहीरनाम्याची १०० वर्षे, स्वातंत्र्य चळवळीची विचारधारा, पक्षांतर बंदी? नव्हे, अनियंत्रित नेतेशाहीची नांदी इत्यादी. त्यांची मराठी भाषेतील पुस्तके प्रसिद्ध आहेत. त्यांनी हिदीत व इंग्रजीतही पुष्कळ लेखन केलेले आहे. राजनिती का नया मोड, मार्क्सवाद और गांधीवाद, संक्रमणकालीन राजनिती इत्यादी. तर प्राईम मुव्हर्स: रोल ऑफ द इंडिव्हिज्युअल इन हिस्टरी हे इंग्रजी पुस्तक प्रसिद्ध आहे. अशा या धडाडी नेत्याचे दि.०८ जानेवारी १९९५ रोजी निधन झाले.

**!! मधुजी लिमये यांना स्मृतिदिनी विनम्र अभिवादन !!**

**– संकलन व सुलेखन –**
**कृष्णकुमार निकोडे गुरूजी**
**रामनगर वॉर्ड, गडचिरोली.**
**फक्त व्हॉट्सॲप– ९४२३७१४८८३.**

# कोकण भवनात भारतीय प्रजासत्ताक दिन पूर्व तयारीची बैठक संपन्न

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.७, नवी मुंबई :** भारतीय प्रजासत्ताक दिनाच्या अनुषंगाने आज पूर्व तयारीची बैठक कोकण विभागाच्या सामान्य शाखेचे अपर आयुक्त संजीव पलांडे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली.

कोकण भवनातील पहिला मजला, समिती सभागृह येथे झालेल्या या बैठकीत सिडको अग्निशमन विभागाचे मुख्य अधिकारी विजय राणे, उद्यान अधीक्षक विशाल भोर, पनवेल महानगर पालिकेचे दशरथ भंडारी, नवी मुंबई महानगरपालिका शिक्षण विभागाच्या सुलभा बारघरे, रायगड विद्युत विभागाच्या कार्यकारी अभियंता एसडी कट्टी, बृहन्मंबई राज्य कर्मचारी



संघटनेचे उपाध्याक्षा अस्मिता जोशी, कोकण भवन विद्युत विभागाचे उप अभियंता प्रविण कुमार शिवदास, कोकण विभागातील विविध विभागातील अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

कोकण विभागीय स्तरावरील भारतीय प्रजासत्ताक दिनाचा ७६ वा वर्धापन दिन समारंभ दि.२६ जानेवारी २०२५ रोजी सकाळी ०९:१५ वाजता साजरा होणार आहे.

मुख्य शासकीय ध्वजारोहण कळंबोली पोलीस मुख्यालय मैदानावर होणार आहे. त्या अनुषंगाने बैठकीत मार्गदर्शन करताना पलांडे यांनी कोकण भवनातील सर्व विभागाने हा सोहळा यशस्वीरित्या व उत्साहात साजरा करण्याबाबत सूचना दिल्या. प्रत्येक विभागाने आपली जबाबदारी व्यवस्थित पार पाडावी आणि हा कार्यक्रम उत्साहात साजरा करावा, असे सांगून सर्वांनी शासकीय पोशाखात कार्यक्रमास उपस्थित राहावे. असे त्यांनी यावेळी सांगितले.

### अभिजात दर्जा..

मराठी अभिजातभाषा
रुंजे अपेक्षा मनामनात
मराठी जयघोष उच्चतो
प्रतिध्वनी कानाकानात

पाचवी पुजते हेटाळणी
केवढी कष्टली उन्हांत
हक्क असूनि सिंहासनी
विजनवास रानां वनात

स्वप्नांचे जलाशय हसले
रे सारस्वतांच्या नयनात
साफल्य आनंद आगळा
समिधा सुशुध्द हवनात

हवा का अभिजातदर्जा
संशयी वैफल्य जनात
थिटे पडले ते टिकाकार
अल्प भर घाली ज्ञानांत

निष्क्रीयता सजूनबसते
मुढांचासंतोष अज्ञानात
माय मराठी जगत्जननी
मखरीबसली सन्मानात

सळाळला म-हाठी ध्वज
शिर उंचवा अभिमानात
विपुल ते साहित्यसमृध्द
गौरवले जावे गरिमानात

**- हेमंत मुसरीफ, पुणे.**
**९७३०३०६९९६**

# प्रशासनाच्या दिरंगाईमुळे वयोवृद्ध महिलेला अद्याप घर नाही

## गुहागर मनसेचे २६ जानेवारीला लक्षणीय उपोषण !

**अक्षराज : उदय दणदणे**

**दि.०७, गुहागर :** गुहागर तालुक्यातील पांगारी तर्फे वेळंब येथील वृद्ध महिला सुवर्णा शांताराम खांबे यांच्या राहत्या घराचे पूर्णतः नुकसान होऊनहीं अद्याप नुकसान भरपाई देण्यात आली नसल्याने महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने आंदोलन छेडण्यात येणार असल्याबाबत दिनांक ०६ जानेवारी २०२४ रोजी गुहागर तहसीलदार यांना निवेदन दिले असल्याचे माहिती महाराष्ट्र नवनिर्माण सेना जिल्हा उपाध्यक्ष विनोद गणेश जानवळकर यांनी दिली.



निवेदनात म्हटले आहे की गुहागर तालुक्यातील पांगारी तर्फे वेळंब येथील वृद्ध महिला सुवर्णा शांताराम खांबे यांच्या राहत्या घराचे पूर्णतः नुकसान होऊनहीं या महिलेला अद्याप कोणत्याही प्रकारची आर्थिक नुकसान भरपाई शासनाकडून देण्यात आली नाहीं.शासनाच्या या दिरंगाईमुळे सदरची महिला दुसऱ्याच्या घरामध्ये राहत असून या महिलेला घरकुल योजनेअंतर्गत तात्काळ घर मिळावे यासंदर्भात अनेक वेळा आपणाशी तसेच पंचायत समितीच्या गटविकास अधिकाऱ्यांची वेळोवेळी चर्चा करूनही अद्यापही कोणत्याही प्रकारची कारवाई शासनाकडून झाली नाही. या महिलेला येत्या पंधरा दिवसाच्या आत आपण योग्य ते सहकार्य न केल्यास महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने २६जानेवारी२०२५रोजी लक्षणीय उपोषण करण्यात येणार असल्याचे निवेदनात म्हटले आहे. पावसाळ्यामध्ये अतिवृष्टीमुळे या महिलेच्या घराचे शंभर टक्के नुकसान झाले होते. त्यावेळी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या कार्यकर्त्यांनी त्याची पाहणीही केली होती, तसेच या महिलेसाठी प्राथमिक उपचारासाठी आर्थिक मदत ही करण्यात आली होती. या महिलेला मोदी आवास योजनेअंतर्गत घरकुल मिळण्यासाठी आपल्या स्तरावरून जास्तीत जास्त प्रयत्न करू असे आश्वासन देखील आपण तहसीलदार म्हणून तसेच पंचायत समितीचे गटविकास अधिकारी यांनी दिले होते परंतु सहा महिने उलटून गेले तरी अद्यापही या महिलेला कोणत्या प्रकारची मदत शासनाकडून झाली नाही. हे खरे दुर्दैव आहे.

गेल्या पावसाळ्या मध्ये अतिवृष्टीमुळे पांगारी तर्फे वेळंब येथील सुवर्णा शांताराम खांबे यांच्या राहत्या घराचे पूर्णतः नुकसान झाले होते. या घरातील वयोवृद्ध महिला सुवर्णा यांच्या पायाला दुखापत झाली होती. तर घराचे नुकसान १ लाख रुपये झाल्याचे पंचनाम्यात म्हटले होतें. या घराची शासनाचे महसूल अधिकारी तसेच पंचायत समिती व ग्रामपंचायत तसेच गावातील प्रमुख लोकांनी प्रत्यक्ष पहाणी केली होती,परंतु शासन स्तरावरून या महिलेला कुठलीच मदत देण्यात आली नाही. त्यावेळी आपण तसेच ज्यांनी ज्यांनी या घराची पाहणी केली त्यांनी या महिलेला न्याय देऊ असे म्हटले होते परंतु आजतगायत कोणीही या महिलेला आर्थिक मदत तसेच शंभर टक्के नुकसान झालेल्या घराला शासनाच्या कुठल्या योजनेतून घर मिळण्यासाठी मदत केली नाही. या संदर्भात आपल्या स्तरावरून पंधरा दिवसाच्या आत आपण कोणते प्रकारचे कार्यवाही न केल्यास गुहागर तहसील कार्यालय समोर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने २६जानेवारी २०२५रोजी लक्षणीय उपोषण करण्यात येईल असे निवेदनाद्वारे प्रशासनाला इशारा देण्यात आला आहे.

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## अतिट येथे महाआरोग्य शिबीर संपन्न



**अक्षराज : बाळू धायगुडे**

**दि.०७, खंडाळा (सातारा) :** मौजे अतिट येथे मैत्री फौंडेशन अतिट व मानसी मेमोरीयल हॉस्पिटल खंडाळा यांच्या सहकार्याने महाआरोग्य शिबीर आयोजित केले. यामध्ये गावातील १२५ स्त्रिया व पुरुषांनी या महाआरोग्य शिबिराचा लाभ घेतला. यावेळी डोळ्याचे विकार, शारीरिक व्याधी यांची मोफत तपासणी करण्यात आली. यावेळी मानसी हास्पिटल खंडाळ्याचे डॉ.महेंद्र ढम ाळ यांचे मोलाचे सहकार्य लाभले. यावेळी अतिट ग्रामपंचायत चे सरपंच रुपालीताई अंकुश जाधव, भाजपा उपाध्यक्ष संभाजी जाधव पाटील, कोलंबस संस्थेचे शिरीष गाढवे सर, त्यांचे सहकारी तसेच अतिट गावातील विविध क्षेत्रातील मान्यवर, आजी- माजी पदाधिकारी, गावातील ग्रामस्थ महिला, उत्साही कार्यकर्ते, जुनी जाणती मंडळी, जेष्ठ नागरिक व मैत्री फौंडेशनचे सर्व सभासद उपस्थित होते.गावातील सर्व ग्रामस्थानी या शिबिरास अतिशय उत्सुर्फ प्रतिसाद दिला.सर्वांनी या महाआरोग्य शिबिराच्याआयोजन याबाबत समाधान व्यक्त केले. तसेच मैत्री फौंडेशनचे व मानसी हॉस्पिटलचे आभार मानले.

## खार्डी फडकेपाडा रिक्षा चालकाकडून सत्यनारायण महापूजेचे आयोजन



**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.०७, खार्डी (ठाणे) :** आई गावदेवी रिक्षा चालक-मालक संघटना खार्डी - फडके पाडा यांच्यातर्फे मंगळवार, दिनांक ०७ जानेवारी २०२५ रोजी श्री सत्यनारायणाची महापूजा गावदेवी मंदिर खार्डी फडके पाडा येथे आयोजित केली होती. आई गावदेवी आणि श्री सत्यनारायणाची पूजा ५ जोडप्यांनी केली. पूजा ही ३ ते ५ वाजेपर्यंत करण्यात आली. त्यानंतर महाप्रसादाचा लाभ ५ ते रात्री १२ वाजेपर्यंत होते. महाप्रसादाचा लाभ पंचक्रोशीतील १५०० भाविकांनी घेतला. यंदाचा वर्ष हे ३ रे होते. सायंकाळी ६ ते ७ वाजेपर्यंत गावदेवी हरिपाठ महिला मंडळ खाडी यांनी हरिपाठ सादर केले. ७ ते ८ शिवशक्ती गायन पार्टी खार्डी, गायक : जयवंत पाटील, रुपेश पाटील व इतर मंडळी यांनी देवीचे गाणी सादर केले.८ ते ११:३० वाजेपर्यंत निखिल पाटील प्रस्तुत आर्केस्ट्रा आम्ही बाळकुमकर स्वर संध्या संगीत कार्यक्रम धमाल भक्तीगीत लोकगीत कोळी गीत ऑर्केस्ट्राचेही आयोजन केले होते.

खास करून सर्व रिक्षा चालकांनी पांढरा पोशाख परिधान केला होता आणि डोक्यावर पांढरी टोपी होती. रिक्षा चालक हा आपल्या रिक्षातून प्रवासी घेऊन जात असतो. वर्षभर आई गावदेवी आणि सत्यनारायणाच्या आशीर्वाद सर्व रिक्षा चालकांवर असावा. आणि येणाऱ्या संकटापासून रक्षण व्हावे यासाठी २०० आई गावदेवी रिक्षा चालक एकत्र येऊन ही सत्यनारायणाची पूजा करत असतात. स्वतः रिक्षा चालक वर्गणी काढून श्री सत्यनारायणाची महापूजा करत असतात. सकाळपासून रात्री १२ वाजेपर्यंत संघटनेचे सर्व रिक्षा चालक काम करत असतात. येणाऱ्या भाविकांचे सुद्धा स्वागत करत असतात. १५०० शे भाविक महाप्रसादाचा लाभ घेत असतात हा एक वेगळाच आनंद त्यांना पहायला मिळत असतो. या महापूजेची चर्चा पंचक्रोशीत होत असते.

## समता नगरमधील रस्त्याचे काम तात्काळ सुरु न केल्यास आमरण उपोषणाचा इशारा

**अक्षराज : संगीता वनकळस**

**दि.०७, धाराशिव :** शहरातील समता नगरमधील गणेशविसर्जन विहिर ते सुधीर पाटील यांचे घरापर्यंत रस्त्याचे काम रखडले आहे. हे काम तात्काळ सुरु करण्यात यावे, अन्यथा याच रस्त्यावर आमरण उपोषण आंदोलन करणार असल्याचे निवेदन सम ता गृहनिर्माण सोसायटीचे चेअरमन संतोष (नाना) घाटगे यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिले आहे. शहरातील नाईकवाडीनगर, समता नगरमधील विसर्जन विहिर ते सुधीर पाटील यांचे घरापर्यंत रस्त्याचे काम मंजूर होवून प्रत्यक्षात कामकाज सुरू झालेले होते. परंतु संबंधीत ठेकेदाराने हे काम बंद केल्यामुळे वाहनचालकांसह सर्वसामान्य नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. हा रस्ता रहदारीचा असल्याने हजारोच्या संख्येने वाहने ये-जा करतात. त्यामुळे सर्वत्र धुळीचे साम्राज्य पसरले आहे. त्यामुळे या भागातील अनेक रहिवाशांना धुळीमुळे श्वसनाचा भयंकर त्रास होत आहे. तरी संबंधीत ठेकेदारास रस्त्याचे काम तत्काळ सुरू करण्याचे आदेश देण्यात यावेत. अन्यथा रखडलेल्या रस्त्यावर दिनांक १५ जानेवारी २०२५ पासून आमरण उपोषण करणार असल्याचा इशारा समता गृहनिर्माण सोसायटी चेअरमन संतोष (नाना) घाटगे यांच्यासह इतर पदाधिकाऱ्यांनी दिला आहे. निवेदनावर विक्रम इंगळे, आयुब शेख, सुधीर जगदाळे, इक्राम सय्यद, विठ्ठल खिचडे, शेषेराव टेकाळे, बिभीषण माळी, हरिदास लोमटे, गणेश आचार्य, मीर काझी, व्ही. एच. वेदपाठक व इतर सदस्यांची स्वाक्षरी आहे.

## लग्नाच्या वाढदिवशीच दाम्पत्याची आत्महत्या

**अक्षराज : प्रतिनिधी :**

**दि.०७, नागपूर :** जरीपटका पोलीस ठाण्याच्या हद्दीतील मार्टीननगरात एका दाम्पत्याने लग्नाच्या वाढदिवशी आत्महत्या करण्यापूर्वी व्हिडिओ बनवला. तो व्हिडिओ व्हॉट्सअॅप स्टेटसवर ठेवला आणि त्यानंतर गळफास घेऊन आत्महत्या केली. ही दुर्दैवी घटना मंगळवारी दुपारी बारा वाजता उघडकीस आली. मुलं होत नसल्यामुळे दाम्पत्याने जीवनयात्रा संपविल्याचे कारण समोर आले आहे. या घटनेमुळे जरीपटका परिसरात एकच खळबळ उडाली आहे. जारील ऊर्फ टोनी ऑस्कर मॉनक्रिप (५४) आणि पत्नी अॅनी जारील मॉनक्रिप (४५) अशी आत्महत्या केलेल्या दाम्पत्याची नावे आहेत.सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, टोनी आणि अॅनी यांनी प्रेमविवाह केला होता. दोघांचाही सुखी संसार सुरु होता. परंतु, त्यांना मुलं होत नव्हती. त्यामुळे आयुष्यात नैराश्य आले होते. दोघेही खचलेल्या मनाने एकमेकांना सांभाळून घेत संसार करीत होते. करोनानंतर टोनीच्या हातचे काम सुटले. तेव्हापासून टोनी नैराश्यात गेला. गेल्या दोन वर्षापासून टोनीच्या हाताला काम नव्हते. त्यामुळे दोघेही पती-पत्नी उदास राहत होते. मुलं नसल्यामुळे आता जीवनाला काय अर्थ आहे? असा प्रश्न त्यांना नेहमी पडत होता. मात्र, नातेवाईक त्यांची समजूत घालून दोघांचेही मन सांभाळत होते. परंतु, टोनी आणि अॅनी यांनी जीवनयात्रा संपविण्याचा निर्णय घेतला.

## आळेफाटा पोलिसांनी मोटारसायकल, टायर चोरणाऱ्या चोरांकडून केला ३१ लाखांचा माल हस्तगत



**अक्षराज : प्रमोद दिवेकर**

**दि.०७, आळेफाटा (पुणे) :** आळेफाटा पोलिसांनी पुणे व अहम दनगर जिल्ह्यातून कार, मोटारसायकल व टायर चोरणारी अट्टल चोरट्यांची टोळी जेरबंद करून एकूण ३१ लाख २० हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

शुभम भाऊसाहेब घुले आदित्य सुदाम केदारी असे पोलिसांनी ताब्यात घेतलेल्या इसमांची नावे असून आळेफाटा पोलीस स्टेशन येथे दि.०७ ऑक्टोबर २०२४ रोजी श्रीकांत भाऊसाहेब भुजबळ, आळे यांनी त्यांची मारुती सुझुकी कंपनीची इको कार कोणीतरी अज्ञात चोरट्याने चोरी करून नेल्याची फिर्याद दिली होती. सदर गुन्ह्याच्या तपासादरम्यान सहायक पोलीस उपनिरीक्षक चंद्रा डुंबरे, पोलीस हवालदार विनोद गायकवाड, पंकज पारखे, अमित पोळ, पोलीस कॉन्स्टेबल अमित माळुंजे हे तपास करीत असताना गुन्ह्यात चोरी केलेली मारुती सुझुकी इको कार चालवत नेताना काही जण सापडले. त्यांना थांबून त्यांच्याकडे इको कारबाबत चौकशी केली असता त्यांनी कार चोरल्याची कबुली देतानाच अधिक चौकशी केली असता त्यांनी म ोटारसायकल चोरी, टायर चोरीचे पुणे व अहमदनगर जिल्ह्यात रोशन गोरक्षनाथ भवर कृष्णा सोमनाथ शेजूळ, आकाश शेंगाळ यांच्याबरोबर मिळून केल्याचे सांगितले.

यातील रोशन गोरक्षनाथ भवर याला तसेच टायर चोरीमध्ये सुनील सुरेश मधे उर्फ सुनील रामदास भुतांब्रे हा सामील असल्याने त्यालाही टायर चोरीच्या गुन्ह्यात अटक करण्यात आली आहे. आरोपींनी कार, टायर, मोटारसायकल चोरीचे गुन्हे केले असल्याची कबुली दिली असून २० गुन्हे उघडकीस आले आहे.

सदरची कामगिरी ही पुणे ग्रामीणचे पोलीस अधीक्षक पंकज देशमुख, अप्पर पोलीस अधीक्षक रमेश चोपडे, जुन्नर उपविभागीय पोलीस अधिकारी रवींद्र चौधर, स्थानिक गुन्हे अन्वेशण विभागाचे पोलीस निरीक्षक अविनाश शिळीमकर यांच्या मार्गदर्शनाखाली आळेफाटा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक दिनेश तायडे यांनी दिलेल्या सूचनेप्रमाणे सहायक पोलीस निरीक्षक अमोल पन्हाळकर,पोलीस उपनिरीक्षक विनोद धुर्वे,

सहायक पोलीस निरीक्षक चंद्रा डुंबरे,पोलीस हवालदार विनोद गायकवाड, भीमा लोंढे, अमित पोळ, पंकज पारखे, पुरुषोत्तम थोरात, सुनील गिरी, पोलीस कॉन्स्टेबल अमित म ाळुंजे, शैलेश वाघमारे, गणेश जगताप, गणेश सपकाळ, किरण शेळके, संतोष साळुंखे यांनी केली आहे

# पश्चिम वाहिन्यांचे पाणी वळविण्याचा प्रकल्प ४ वर्षांत पूर्ण होईल

## जलसंपदा मंत्री विखे यांचा विश्वास; ५२ टीएमसी पाणी उपलब्ध होणार



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०७, अहिल्यानगर :** पश्चिम वाहिनी नद्यांचे पाणी गोदावरी खोर्यात वळविण्याचा महत्वाकांक्षी प्रकल्प मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या म ार्गदर्शनाखाली हाती घेतला आहे. हा प्रकल्प यशस्वी करून सुमारे ५२ टीएम सी पाणी उपलब्ध केले जाणार आहे.

या प्रकल्पासाठी पंतप्रधान नरेंद्र म ोदी यांचे पाठबळ आहे. युध्दपातळीवर हे काम हाती घेतले आहे. पुढील ३ ते ४ वर्षात ते मार्गी लागेल. असा विश्वास जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी व्यक्त केला. समन्यायी पाणी वाटपावरून नगर-नाशिक विरूध्द मराठवाडा हा वाद सुरू आहे.

यातूनही यामुळे मार्ग निघेल असेही ते म्हणाले. कुकडी व घोड कालवा सल्लागार समितीची बैठक मंत्री विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली पहिल्यांदाच अहिल्यानगरमध्ये झाली.

यानंतर आयोजित पत्रकार परीषदेत ते बोलत होते. बैठकीसाठी आ. काशिनाथ दाते, आ. ज्ञानेश्वर कटके, आ. शरद सोनवणे, आ. नारायण पाटील, जिल्हाधिकारी सिध्दाराम सालीमठ, कृष्णा पाटबंधारे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक अतुल कपोले, मुख्य अभियंता हेमंत धुमाळ, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष येरेकर उपस्थित होते. तर आ. विक्रम पाचपुते, पुणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील दूरदृश्य प्रणालीव्दारे सहभागी झाले होते.

मंत्री विखे पाटील म्हणाले, गोदावरी खोर्यातील समन्यायी पाणीवाटपासाठी जायकवाडी प्रकल्पात ६५ टक्के जलसाठ्याची अट मेंढेगिरी समितीने निश्चित केली होती. ती आता सात टक्क्यांनी घटवून ५८ टक्के शिफारस केली असल्याचे वृत्त आहे. मात्र ही समिती मी जलसंपदा खात्याचा पदभार घेण्यापूर्वी कार्यरत आहे.

यासंदर्भात पुढील आठवड्यात बैठक घेणार असून आढावा घेतला जाईल. मात्र मराठवाड्यावर अन्याय करण्याची शासनाची कुठलीच भुमिका नाही. हा फार अडचणीचा मुद्दा असल्याने मला वाटत नाही.

मुळात पश्चिम वाहिनी नद्यांचे पाणी गोदावरी खोऱ्यात वळून ५२ टीएमसी पाणी उपलब्ध केले जाणार आहे. यानंतर हे सर्व प्रश्न ही मार्गी लागतील असेही ते म्हणाले. मुळा धरणातील गाळ काढून त्याची उंची वाढविण्या संदर्भात स्वतंत्र प्रस्ताव तयार करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

राज्यातील धरणांमध्ये मोठ्या प्रमाणात गाळ साचला आहे. त्यामुळे धरणातील पाणी साठवण क्षमता कमी झाली आहे. गाळ काढण्यासंदर्भात याआधी काही निर्णय झाले आहे का? याची लवकरच माहिती घेऊ असेही विखे पाटील म्हणाले.

# पत्रकार हा लोकशाहीचा भक्कम आधारस्तंभ - तहसीलदार नाईकवाडे



**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.०७, विंचूर (नाशिक) :** पत्रकार हा लोकशाहीचा आधारस्तंभ आहे. समाजातील सत्य आणि पारदर्शकता जपण्याचे महत्त्वाचे कार्य पत्रकार करतात. त्यांच्या लेखणीमुळे समाजाला योग्य दिशा मिळते. शासनाच्या योजना सोप्या शब्दांमध्ये नागरिकांपर्यंत पोहोचवण्याचे मोलाचे कार्य पत्रकार करत असल्यामुळे, शासनाचा लोकजागृतीचा बराच तान हलका होतो. असे कौतुक निफाड चे तहसीलदार विशाल नाईकवाडे यांनी केले. पत्रकार दिनाचे औचित्य साधून दि.०६ जानेवारी २०२५ रोजी निफाड तहसील कार्यालय येथे विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी अध्यक्ष भाषण करताना जे बोलत होते. यावेळी व्यासपीठावर डॉ राजीव तांभाळे (उपअधीक्षक, जिल्हा रुग्णालय निफाड), डॉ. सुजित कोशिरे (तालुका वैद्यकीय अधिकारी, पंचायत समि ती निफाड) व प्रशांत बोरसे (विस्तार अधिकारी, ग्रामपंचायत समिती निफाड) अरुण खांगळ( निफाड तालुकाध्यक्ष), निवासी नायब

तहसीलदार श्रीमती दिपाली खेडेकर, ज्येष्ठ पत्रकार अरुण भाई शेख, ॅड शेखर देसाई, आदी उपस्थित होते. या कार्यक्रमात पत्रकारांना लेखणी डायरी व पुष्पगुच्छ प्रदान करून गौरव करण्यात आला. या उपस्थितीत म ान्यवरांनी पत्रकारांच्या योगदानाची प्रसंशा सकारात्मक प्रेरणा देणारे मनोगत व्यक्त केले.

समाजाचा खरा दर्पण पत्रकार आहेत. त्यांच्या कार्यातून लोकशाहीला बळकटी येते, त्यामुळे हा फक्त पत्रकारांचा सन्मान नसून समाजाच्या आवाजाचा सन्मान असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले. बातमीचा धांडोळा घेताना पत्रकार पूर्णपणे दिवस - रात्र २४ तास प्रयत्नशील असतात. त्यामुळे वेळेची मर्यादा न पाळता कार्यरत असल्याने, त्यांच्या आरोग्याकडे दुर्लक्ष होते. म्हणून पत्रकार दिनाच्या औचित्य साधून सर्व पत्रकारांचे आरोग्य तपासणीचा उपक्रम राबवत आहोत. हा उपक्रम एक दिवशीय नसून वर्षभरात केव्हाही ग्रामीण रुग्णालय निफाड येथे आरोग्य तपासणी करण्याची संधी पत्रकारांना उपलब्ध असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी पत्रकारितेचा भूतकालीन आढावा आणि वर्तमान व परिस्थिती याविषयी त्यांनी भाष्य केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक निलेश देसाई यांनी केले तर सूत्रसंचालन बाजीराव कमानकर यांनी केले.

तालुक्याचा ज्ञानकोश बनवण्याचा मानस निफाड तालुक्याला मोठा इतिहास लाभलेला आहे. तो जगभर पोहोचवावा यासाठी तालुक्याचा ज्ञानकोश बनविण्याचा मानस असल्याचे तहसीलदार नाईकवाडे यांनी सांगत या कार्यात मदत करण्याचे आवाहन त्यांनी पत्रकारांना केले. ज्ञानकोश किंवा संदर्भ कोश तयार झाल्यास नागरिक आणि विद्यार्थ्यांना तालुक्याची माहिती सहज उपलब्ध होणार आहे. त्याप्रमाणे तालुक्यात पत्रकार भवणासाठी लागणारी शासकीय पातळीवरील मदत करण्यास आम्ही सदैव तत्पर आहोत.

# छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याभोवती असलेले वाईन शॉप व बीअर बार इतरत्र हटवा



**अक्षराज : प्रतिनिधी :**

**दि.०७, धाराशिव :** धाराशिव शहरातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याच्या भोवती असलेले वाईन शॉप व बीअर बार इतरत्र हटवून छत्रपती शिवाजी महाराज चौक अतिक्रमणमुक्त करण्यात यावा अशी मागणी बहुजन योद्धा सामाजिक संघटनेच्या वतीने करण्यात आली आहे. मागणीची दखल न घेतल्यास लोकशाही मार्गाने आंदोलन करणार असल्याचे निवेदन जिल्हाधिकाऱ्यांना संघटनेमार्फत मंगळवारी (दि.७) देण्यात आले.

निवेदनात म्हटले की, महाराष्ट्रासह संपूर्ण देशातील अठरापगड जातींचे आराध्यदैवत असलेले छत्रपती शिवाजी महाराज यांचा भव्यदिव्य अश्वारूढ पुतळा धाराशिव शहरातील मध्यवर्ती ठिकाणी छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे उभारण्यात आलेला आहे. तत्कालीन जिल्हाधिकारी रामानंद तिवारी यांच्या कार्यकालात सन १९८३ सालात उभारण्यात आलेल्या या पुतळ्यामुळे धाराशिव शहराच्या सांस्कृतिक वैभवात मोठी भर पडली. परंतु सध्या हा पुतळा वाईन शॉप आणि तळीरामांच्या विळख्यात अडकला आहे.

पुतळ्याच्या पूर्वेस एक वाईन शॉप आणि एक बीअर बार तर पश्चिमेस आणखी एक वाईन शॉप असल्यामुळे पुतळा सतत तळीरामांचा गोंधळ, कधीकधी हाणामारीचे प्रसंग घडत आहेत. अशा घटनांमुळे वाहतुकीची कोंडी होऊन येथे नेहमीच गोंधळाची परिस्थिती निर्माण होत आहे. अनेकदा तर येथे कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होत आहे.

शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी आणि छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याच्या भोवती अशी परिस्थिती अशोभनीय आहे. आधी पुतळ्याची उभारणी झालेली असताना इथे वाईन शॉप आणि बीअर बार सुरू करण्यास परवानगी कोणी दिली याचीही चौकशी करण्यात यावी. अशी परवानगी देणाऱ्या राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या तत्कालीन अधिकाऱ्यावर कारवाई करण्यात यावी. त्याच बरोबर छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याच्या भोवती असलेले दोन्ही वाईन शॉप आणि एक बीअर बार इतरत्र हलवून छत्रपती शिवाजी महाराजांचा सन्मान राखला जावा अशी विनंती आम्ही या निवेदनाद्वारे करत आहोत. मागणीची दखल न घेतल्यास लोकशाही पद्धतीने प्रशासनाविरोधात तीव्र आंदोलन करण्यात येईल. कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्यास त्याची जबाबदारी प्रशासनावर राहील असेही बहुजन योद्धा सामाजिक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष धनंजय शिंगाडे यांनी निवेदनात म्हटले आहे. निवेदनावर धर्मवीर कदम, गणेश वाघमारे, यु.व्ही.माने, शरद जगदाळे, अनिरुद्ध कावळे व इतर शिवप्रेमींची स्वाक्षरी आहे.

